





**FLN वर आधारित**

# कार्यानुभव पुस्तिका भाग - १

## इयत्ता:- ३ री

**नाव :** ______________________

**इयत्ता :** ______________________

**शाळा :** ______________________

## पालक/शिक्षक/मेंटर यांच्यासाठी महत्वाच्या सूचना







- ही पुस्तिका 'निपुण भारत' या मिशनमध्ये निर्देशित केलेल्या मार्गदर्शक तत्वांवर आधारित असून, विद्यार्थ्यांना त्यांच्या वयानुसार शिक्षणाचे अनुभव घेण्यासाठी मदत व्हावी, अशा पध्दती संरचित करण्यात आलेली आहे.
- या पुस्तिकेमध्ये खालील घटकांचा सराव दिलेला आहे.
  - भाषा – श्रवण, संभाषण, वाचन आणि लेखन.
  - मूलभूत सांख्यकीय कौशल्य – संख्यांची गणना, चित्रांच्या सहाय्याने आणि मनातल्या मनात मूलभूत गणिती क्रिया.
  - सद्यस्थितीचे निरीक्षण करणे आणि चित्र, कथा कथन आणि इतर माध्यमांचा वापर करुन नोंदवणे.
- विद्यार्थ्यांची वाचन आणि लेखन कौशल्ये आत्मसात करण्याची ही सुरुवातीची पायरी असल्याने त्यांना वडीलधाऱ्यांची मदत आवश्यक आहे.
- वडीलधाऱ्या व्यक्तींनी प्रत्येक उपक्रमासाठी फक्त सूचना वाचल्या पाहिजेत. विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे
- उपक्रम करण्याचा प्रयत्न करण्यासाठी प्रोत्साहित केला पाहिजे. जेव्हा विद्यार्थी मदत मागेल, तेव्हाच वडीलधाऱ्या व्यक्तींनी मदत केली पाहिजे.
- विद्यार्थ्यांने दर आठवड्याला किमान चार पानांवरील उपक्रम पूर्ण करावेत असे अपेक्षित आहे.
- सरावासाठी आवश्यक असल्यास विद्यार्थ्यांला अधिक पाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

**उपक्रमाचे स्वरुप समजण्यासाठी खालील चिन्हांचा वापर केलेला आहे.**

| | |
|---|---|
| कृतीयुक्त उपक्रम |  |
| गिरवणे, चित्रकला, लेखन |  |
| रंगकाम |  |
| श्रवण |  |
| संभाषण |  |
| पालक किंवा वडीलधाऱ्या व्यक्तींसोबत मिळून करावयाचा उपक्रम |  |

दिनांक : ........ / ........ / ........

**प्रत्येक आकार तयार करण्यासाठी किती काड्यांची गरज आहे?**
**काडीपेटीमधील काही काड्या घे आणि हे आकार तयार कर.**

**म्हण, गिरव आणि पुन्हा लिही.**


Aa Aa Aa Bb Bb Bb Cc Cc Cc

Dd Dd Dd Ee Ee Ee Ff Ff Ff

दिनांक : ........ / ........ / ........

**खालील चित्रे पाहून गोष्ट सांग. इंग्रजी आणि मराठी शब्दांच्या अर्थानुसार जोड्या लाव.**

## टोपी फिरायला जाते



River

मुलगा

Boy

Calf

सूर्य

नदी

Sun

Cow

बुट

शर्ट

Shoes

Shirt

आश्चर्य

टोपी

Cap

Wonder

गाय

वासरु

दिनांक : ........ / ........ / ........

**मोठ्याने वाच.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क क | ख ख | ग ग | घ घ | च च |
| छ छ | ज ज | झ झ | ञ ञ | ट ट |
| ठ ठ | ड ड | ढ ढ | ण ण | त त |
| थ थ | द द | ध ध | न न | प प |
| फ फ | ब ब | भ भ | म म | य य |
| र र | ल ल | व व | श श | स स |
| ष ष | ह ह | ळ ळ | क्ष क्ष | ज्ञ ज्ञ |

---

**मोठ्याने वाच. रिकाम्या जागेत शब्द पुन्हा लिही.**

वि---ल




विठ्ठल

ठ् + ठ = ठ्ठ

हक्क गप्प हद्द दत्त


भक्कम कट्टर हिम्मत शिल्लक

बहाद्दर कट्ट्यावर किल्ल्यावर






आक्का चादर आण.

दिनांक : ........ / ........ / ........

**खाली दिलेल्या सर्व प्राण्यांना Ⓐ अक्षराशी आणि सर्व पक्ष्यांना Ⓑ अक्षराशी जोड.**




**प्रत्येक चित्राची योग्य संख्येशी जोडी लाव.**

| | | |
|---|---|---|
|  | 20 | ⑤ ⑤ ② ② |
|  | 14 | ⑩ ⑤ ① ② ② |
|  | 4 | ⑩ ① ① |
|  | 12 | ⑤ ① ① |
|  | 7 | ① ① ② |

दिनांक : ........ / ........ / ........

**मोठ्याने वाच. रिकाम्या जागेत शब्द पुन्हा लिही.**

जा---द



जास्वंद

स् + व = स्व

अस्त स्वस्थ कास्य स्वर्ग

अस्वल स्वस्तिक पुस्तक सूर्यास्त

मनस्ताप सांस्कृतिक महोत्सव

मीनाचा स्वभाव शांत आहे.

---

घ--- ळ



घड्याळ

ड् + य = ड्य

सत्य त्याग न्याय वाक्य

व्यायाम साफल्य अन्याय वायव्य

व्यवहार व्याकरण कोट्यावधी

माझ्याकडे बांगड्या आहे.

दिनांक : ........ / ........ / ........

**खाली दिलेली कविता ऐक आणि मोठ्याने वाच.**

## काळा काळा कावळा


**काळा काळा कावळा**
**तो होता तहानलेला!**

**त्याला दिसले भांडे**
**भांड्यात पाणी होते थोडे!**

**कावळा गेला उडून**
**खडे आणले वेचून!**

**पाण्यात टाकले खडे**
**पाणी वर चढे!**

**कावळा पाणी प्यायला**
**आणि भूर्रकन उडून गेला!**



**1) कवितेमधील अधोरेखित केलेल्या शब्दांचे निरीक्षण कर आणि त्याप्रकारचे काही शब्द सांग.**
**2) कवितेमध्ये कोण-कोणते यमक शब्द जुळतात ते सांग.**

---


**म्हण, गिरव आणि पुन्हा लिही.**


Gg Gg Gg Hh Hh Hh Ii Ii Ii


Jj Jj Jj Kk Kk Kk Ll Ll Ll

दिनांक : ........ / ........ / ........

**खालील पक्ष्याचा आकार गिरवून चित्र पूर्ण कर आणि त्यामध्ये रंग भर.**








**बुलबुल**
Bulbul




दिनांक : ........ / ........ / ........

**चित्रामध्ये एकूण किती मासे आहेत? ते मोज आणि त्यांची संख्या पुढील चौकोनात लिही.** ☐




---


**बेरीज आणि वजाबाकी करुन उत्तरे लिही.**




$4 + 6 =$ ☐☐




$4 + 8 =$ ☐☐




$4 + 9 =$ ☐☐



$13 - 3 =$ ☐




$13 - 5 =$ ☐




$13 - 8 =$ ☐

दिनांक : ........ / ........ / ........

**मोठ्याने वाच. रिकाम्या जागेत शब्द पुन्हा लिही.**



सू---



सूर्य

र् + य = र्य

अर्थ वर्ग चर्चा कार्य

पर्वत गर्जना निर्णय संपूर्ण

प्रदर्शन आकर्षण कार्यालय

**गर्वाचे घर खाली.**

---

---ष्ण



कृष्ण

क् + ऋ = कृ

गृह नृत्य वृक्ष सृष्टी

कृपया गृहिणी शृंगार वर्तुळ


मृगजळ वृत्तपत्र भृंगराज

**मृणाली लवकर घरी ये.**

दिनांक : ........ / ........ / ........

**खालील चित्रे काळजीपूर्वक पहा आणि गोष्ट सांग.मराठी शब्दांची इंग्रजीतील शब्दांशी जोडी लाव.**


<u>**दोन मित्र**</u>




| | |
|---|---|
| Fruit | मदत करणे |
| Jump | पोहचणे |
| Far | गाढव |
| Reach | पकडणे |
| Calf | फळे |
| Catch | उडी मारणे |
| Donkey | वासरु |
| Help | मागे - पुढे |
| See-Saw | दुरवर |

दिनांक : ........ / ........ / ........

**डावीकडे चेहरा असलेल्या मगरीला गोल कर.**



**उजवीकडे वळलेल्या चित्रांना गोल कर.**



**डावीकडे वळलेल्या मुंग्याना गोल कर.**



**उजवीकडे वळलेल्या माश्यांना गोल कर.**



**डावीकडे वळलेल्या कबुतरांना गोल कर.**



---

**म्हण, गिरव आणि पुन्हा लिही.**

Mm Mm Mm Nn Nn Nn

Oo Oo Oo Pp Pp Pp

दिनांक : ........ / ........ / ........

**खालील गोष्ट वाच. गरज असल्यास पालकांची किंवा मित्रांची मदत घे. गोष्टीमध्ये अधोरेखित केलेले शब्द तुझ्या वहीत लिही.**




## पाच बोटांची गोष्ट



**एके दिवशी आपल्या हाताची पाच बोटे कोण महान, कोण महत्वाचे, ते बोलू लागले. प्रथम तर्जनी तिच्या महानतेबद्दल बोलली, 'मी सर्वात महान आहे! कारण कोणतीही व्यक्ती किंवा वस्तू ओळखण्यासाठी माझाच वापर होतो.'**



**'नाही नाही मी महान आहे!' मधले बोट म्हणाले 'कारण मी तुमच्या सर्वांपेक्षा उंच आणि बलवान आहे!'**

**''नाही, नाही - मी तुम्हा सर्वांपेक्षा चांगली आहे,' अनामिका म्हणाली.'कारण सर्व माझ्यावर सोन्याच्या मुकुटासारखी अंगठी घालतात! कारण मी दोन मने जोडते! 'म्हणून मी सर्वात महान आहे!'**





**करंगळी म्हणते, 'मी छोटी असेल, पण खूप मोठी आहे. मला सांगा कोणालाही भेटताना किंवा नमस्कार करताना पहिली पुढे कोण येते? म्हणुन मी सर्वात महान आहे!'**


**मला मोजले नाही, तर तुमचा काही उपयोग नाही! कोणतेही काम करण्यासाठी मला तिथे असणे आवश्यक आहे! म्हणून मी सर्वांपेक्षा मोठा आहे! अंगठा म्हणाला.**



**'पाचही बोटांमध्ये मी महान, मी महान यावरुन वाद सुरू झाला. मग हात त्या सर्वांना म्हणाला: 'एक मिनिट! काळजीपूर्वक पहा-**


**तुमच्यापैकी कोणीही एक सर्व कामे करु शकत नाही. गोष्टी घडवून आणण्यासाठी तुम्हा सर्वांची गरज आहे. शिवाय - सर्व सहमत असल्यावरच ते कार्य पूर्ण होऊ शकते! त्यामुळे तुमच्यापैकी कोणीही लहान नाही, कोणीही दुसऱ्यापेक्षा मोठा नाही, कोणीही दुसऱ्यापेक्षा कमी नाही! हाताच्या बोलण्यातले सत्य सर्व बोटांनी ओळखले. 'आम्ही सर्व महान आहोत! एकता महाबलम!' ते म्हणाले, आणि एक मुठ धरुन जवळ आले.**

**पहिल्या चौकोनातील आकारांना क्रमांक दिले आहेत, तर दुसऱ्या चौकोनातील जुळणाऱ्या आकारांना क्रमांक दे.**




**खालीलपैकी तु आज काही पाहिले किंवा ऐकले आहेस का? सभोवताली पाहत रहा. यापैकी जर तु काही पाहिले असेल, तर दिलेल्या चौकोनात ✓ बरोबरची खूण कर. शिवाय काय पाहिले? कधी पाहिले आणि कुठे पाहिले याची देखील शक्य असल्यास नोंद ठेव.**










दिनांक : ........ / ........ / ........

मोठ्याने वाच. रिकाम्या जागेत शब्द पुन्हा लिही.

कु---ड



कुऱ्हाड

र + ह् + अ = ऱ्हा

पऱ्या दऱ्या कोऱ्या गौऱ्या

टिपऱ्या तिसऱ्या देणाऱ्या तोऱ्यात

झऱ्यावर भोवऱ्यात दौऱ्यावर

विमलने कैऱ्या आणल्या.

---

--क



ट्रक

ट् + र = ट्र

राष्ट्र ड्रेस ट्रीप ट्रेन


पेट्रोल राष्ट्रीय सौराष्ट्र ट्रॅक्टर

महाराष्ट्र राष्ट्रभाषा राष्ट्रध्वज

आपले राष्ट्रगीत जन गण मन हे आहे.

दिनांक : ........ / ........ / ........

**खालील 4 चौकोन निळ्या रंगाने, 3 चौकोन काळ्या रंगाने आणि 2 चौकोन पिवळ्या रंगाने रंगव. तर मग किती चौकोन शिल्लक राहतील? ते लिही.** ______________________




**म्हण, गिरव आणि पुन्हा लिही.**

Qq Qq Qq Rr Rr Rr

Ss Ss Ss Tt Tt Tt

दिनांक : ........ / ........ / ........

**खाली दिलेली कविता ऐक आणि मोठ्याने वाच.**



## मधमाशी


ऊठुनि सकाळी ती मधमाशी ।।
जाते की मध मिळवायासी ।।
थेंबे थेंबे उठूनी, साठवी त्यासी ।।
उद्योगी मोठी ।।

आळस तिला ठाऊक नाही ।।
सर्व दिवस ती खपत राही ।।
थंडी ऊन म्हणेना काही ।।
उद्योगी मोठी ।।

गोड गोड मध निपटुनि घेते ।।
थोडा म्हणुनी मुळी न रुसते ।।
साठवुनी तो जपुनी ठेविते ।।
उद्योगी मोठी ।।

थोडाही गुण मिळता घ्यावा ।।
साठा त्याचा नित्य करावा ।।
कोणालाही तो शिकवावा ।।
ठेवा हे चित्ती ।।






**1) कवितेमधील अधोरेखित केलेल्या शब्दांचे निरीक्षण कर आणि त्याप्रकारचे आणखी काही शब्द सांग.**

**2) कवितेमध्ये कोण-कोणते यमक शब्द जुळतात ते सांग.**


दिनांक : ........ / ........ / ........

**ससा गाजरापासून किती दुर आहे ? संख्यारेषेचे निरीक्षण करुन संख्यारेषेवर पुढील संख्या लिही.**





---

**मधमाशी फूलापासून किती दूर आहे ? संख्यारेषेवर दाखविल्याप्रमाणे प्रत्येक भागामध्ये 10 च्या पटीत संख्या लिही.**




---


**डावा हात उजव्या हाताशी जुळव. जसे की बेरीज किंवा वजाबाकी केल्यानंतर संख्या समान येतील.**



दिनांक : ........ / ........ / ........

**खालील चित्रे काळजीपूर्वक पहा आणि गोष्ट सांग. मराठी मधील शब्दांची इंग्रजीतील शब्दांशी जोडी लाव.**

## मोजे कुठे गेले ?



Socks

Bathing

Frogs

fly

Boy

Egret

Lake

Surprise

आश्चर्य

तलाव

बगळा

बेडूक

मुलगा


मोजे


आंघोळ करणे


उडणे

दिनांक : ........ / ........ / ........


**खालील चित्रांमधील मोठ्या वस्तू ओळख आणि त्या चित्राखालील चौकोनामध्ये बरोबरची खूण ☑ कर.**









**खालील चित्रांमधील लहान वस्तू ओळख आणि त्या चित्राखालील चौकोनामध्ये बरोबरची खूण ☑ कर.**







**सारणीमधील मोठ्या लिपीतील** "Q" **व** "S" **आणि लहान लिपीतील** "q" **व** "s" **ला गोल कर.**

Circle big "Q" & small "q"

| | | | | |
|---|---|---|---|---|
| a | F | G | T | R |
| Q | V | s | Q | N |
| C | G | M | W | Q |
| q | q | E | Q | X |
| K | Q | P | j | F |
| T | q | O | Q | J |

Circle big "S" & small "s"

| | | | | |
|---|---|---|---|---|
| p | s | q | s | P |
| d | q | s | q | S |
| A | i | Q | p | v |
| w | S | e | q | X |
| S | t | p | j | f |
| t | q | s | q | J |

दिनांक : ........ / ........ / ........

**मोठ्याने वाच. रिकाम्या जागेत शब्द पुन्हा लिही.**

चं--



चंद्र

द + र् = द्र

चक्र शुक्र मुद्रा प्राणी

क्रमांक प्रसाद नम्रता एकाग्र

प्राणायाम चंद्रकला प्रशिक्षण

प्रकाशने आंबा खाल्ला.

---

कु--



कुत्रा

त् + र = त्र

पत्र चित्र मित्र भित्रा

पत्रिका वाजंत्री मैत्रिण त्रिशुळ


पत्रावळी क्षेत्रफळ त्रयोदशी

बाबांनी बाजारातून संत्री आणली.

दिनांक : ........ / ........ / ........


**खालील चित्रात किती किटक आहेत?** ☐

**सर्व किटकांचे एकूण किती पाय आहेत?** ☐



---

**0 ते 10 दरम्यान 10 रेषा आहेत. प्रत्येक रेष ही 1 आहे. उदा - 10 नंतर 2 रेषा म्हणजे 12, अक्षरांनी संख्यारेषेवर दाखविलेल्या संख्या ओळख आणि लिही.**





*a* = 1 2    *b* = ☐☐    *c* = ☐☐    *d* = ☐☐

*e* = ☐☐    *f* = ☐☐    *g* = ☐☐    *h* = ☐☐

दिनांक : ........ / ........ / ........

मोठ्याने वाच. रिकाम्या जागेत शब्द पुन्हा लिही.





को.......



कोल्हा

ल् + ह = ल्ह

तान्हा म्हणी चिन्ह तेव्हा

म्हातारा नव्हता मल्हारी म्हणाली

उन्हाळ्यात केव्हातरी जिल्ह्यामध्ये

म्हैस रानात चरायला गेली.

.......क्टर



डॉक्टर

ड + ॉ = डॉ

बॅग बॉल डॉल कॉपी


हॉटेल कॅरम झेरॉक्स ऑफिस

ऑक्टोबर व्हॉलीबॉल चॉकलेट

आईने बाजारातून पॉपकॉर्न आणले.



दिनांक : ........ / ........ / ........

**खालील चित्रांमधील जड वस्तू ओळख अणि त्या चित्राखाली दिलेल्या चौकोनात बरोबरची खूण ☑ कर.**










**म्हण, गिरव आणि पुन्हा लिही.**

Uu Uu Uu Vv Vv Vv

Ww Ww Ww Xx Xx Xx

दिनांक : ........ / ........ / ........

**खाली दिलेले शब्दकोडे सोडव आणि रिकाम्या जागेत तुझे उत्तर लिही.**

1. **पाटील बुवा राम राम, दाढी मिशा लांब लांब.**
   **सांगा पाहू मी कोण?** ........................................................

2. **मुकूट याच्या डोक्यावर, जांभळा झगा अंगावर.**
   **सांगा पाहू मी कोण?** ........................................................

3. **पाणी नाही, पाऊस नाही, तरी रान कसं हिरवं, कात नाही, चुना नाही,**
   **तरी तोंड कस रंगलं. सांगा पाहू मी कोण?** ........................................................

4. **इथेच आहे, पण दिसत नाही. सांगा पाहू मी कोण?** ........................................................

5. **तीन जण वाढायला, बाराजण जेवायला.**
   **सांगा पाहू मी कोण?** ........................................................

---

**चित्रात दिलेल्या पक्ष्यांच्या वैशिष्ट्यांसारखे पक्षी पाहिले आहेत का? सभोवताली पाहत रहा. यापैकी जर तु काही पाहिले असेल, तर दिलेल्या चौकोनात बरोबरची खूण ✓ कर. शिवाय काय पाहिले? कधी पाहिले? आणि कुठे पाहिले? याची देखील शक्य असल्यास नोंद ठेव.**













दिनांक : ........ / ........ / ........


**चौकोनातील आकार आणि चौकोनाबाहेरील आकार यांच्या योग्य जोड्या लाव.**



**म्हण, गिरव आणि पुन्हा लिही.**

Yy Yy Yy Zz Zz Zz

**खाली दिलेल्या शब्दातील (W) या अक्षराला गोल कर.**

| watch | draw | sword | well | two |
|---|---|---|---|---|
|  |  |  |  |  |

दिनांक : ........ / ........ / ........

**मोठ्याने वाच. रिकाम्या जागेत शब्द पुन्हा लिही.**

......षी



ऋषी

र + ई = ऋ

ऋतू ऋण ऋचा ऋणी

ऋतुजा ऋत्वीक ऋग्वेद

ऋतुराज ऋषीमुनी ऋषीकेश

ऋषीराज सकाळी लवकर उठतो.

---

.......फळ



श्रीफळ

श् + र = श्र

श्रम श्रेय श्रद्धा श्रेष्ठ


श्रावण आश्रम श्रीखंड श्रमिक


श्रमदान परिश्रम विजयश्री


धनश्री दररोज शाळेत जाते.

दिनांक : ........ / ........ / ........

**खालील पक्ष्याचा आकार गिरवून चित्र पूर्ण कर आणि त्यामध्ये रंग भर.**







KINGFISHER

**किंगफिशर**

**मोठ्याने वाच.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| king | fisher | fish | in | is | her |
| finger | his | ring | fig | sing | if |

दिनांक : ........ / ........ / ........

**खाली दिलेले शब्दकोडे सोडव आणि रिकाम्या जागेत तुझे उत्तर लिही.**

1. सात अक्षरी जिल्हा महाराष्ट्रात, ना असे काना नावात, ना असे मात्रा नावात, ना असे वेलांटी नावात, नांव सांगा त्याचे ? .............

2. मुकुट माझ्या डोक्यावर आहे, जांभळा झगा माझ्या अंगावर आहे, आहेत मला काटे जरा सांभाळून,चविष्ट आहे मी खातात मला भाजून ,सांगा पाहू मी आहे तरी कोण?

.............

3. चार खंडाचे आहे एक शहर ,चार आड विना पाण्याचे,१८ चोर आहेत त्या शहरात, एक राणी आणि एक शिपाई, मारुन सर्वांना त्या आडात टाकी, ओळखा पाहू मी कोण?


.............

4. एका माणसाला बारा मुले ,काही छोटी काही मोठी, काही तापट तर काही थंड ,ओळखा पाहू मी कोण? .............

5. कोकणातून आली एक नार, आहे तिचा पदर हिरवागार , आहे तिचा कंबरेला पोर, सांगा मी आहे तरी कोण? .............


---

**प्रत्येक चौकोनातील चेरीची संख्या मोज आणि लिही.**




दिनांक : ........ / ........ / ........

## खालील संख्यारेषेवर ससा ज्या ठिकाणी उडी मारेल त्या जागी येणारी संख्या लिही.





2 संख्या सोडून उडी मारणे.




3 संख्या सोडून उडी मारणे.

## खाली दिलेल्या चित्रांच्या वजनानुसार क्रम लाव आणी त्यांना क्रमांक दे.



## खालील शब्द 5 वेळा वाच आणि शब्द शिक.

| ab | | ad | | ag | | am | | an | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| cab | lab | bad | dad | bag | nag | dam | ham | can | fan |
| jab | dab | mad | pad | rag | brag | yam | jam | man | ran |
| crab | drab | sad | clad | tag | drag | swam | clam | gran | plan |
| grab | slab | glad | Brad | flag | wag | pram | exam | scan | than |

| ap | | ar | | at | | ed | | en | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| cap | lap | car | far | bat | cat | bed | fed | den | hen |
| map | nap | jar | tar | mat | rat | led | red | men | pen |
| flap | clap | afar | scar | flat | chat | bled | shed | glen | then |
| snap | trap | star | ajar | brat | that | fled | wed | when | ten |

**खालील गोष्ट वाचण्याचा प्रयत्न कर. आवश्यक असल्यास नातेवाइकांची मदत घे. गोष्टीमधील अधोरेखित केलेले शब्द तुझ्या वहीत लिही.**


## खरा मित्र



**एक घनदाट जंगल होतं. तिथं वाघ, सिंह, हत्ती, घोडे, ससे, हरीण, कुत्रे, मोर, लांडोर, पोपट, मैना असे विविध प्रकारचे पशु पक्षी रहात होते. प्राणी, पक्षी आपापले खाद्य मिळविण्याकरता इकडून तिकडे फिरत असत. एकदा एक ससा जंगलातून तुरु-तुरु धावत होता. तेव्हा त्याच्यामागे काही जंगली कुत्री लागली. ससा म्हणजे छोटा व भित्रा प्राणी. तो आपला जीव मुठीत घेऊन धावत सुटला. धावताना त्याला एक घोडा भेटला. त्याने घोड्याला विनंती केली की, मला तुझ्या पाठीवर घे व मला या जंगली कुत्र्यांपासून वाचव. घोडा म्हणाला मला तुला वाचवायला अजिबात वेळ नाही व तो घोडा निघून गेला.**



**पुढे गेल्यावर त्याला हरीण, बकरी असे बरेच प्राणी भेटले. पण सर्वांनी आम्हाला वेळ नाही असंच उत्तर दिलं. शेवटी ससा खूप थकला. तेव्हा त्याला समोरुन एक हात्ती डोलत डोलत येत असताना दिसला. त्याने हत्तीला म्हटलं, हत्ती दादा माझ्या मागे कुत्रे लागलेत. त्या कुत्र्यापासुन मला वाचवा.**



**हत्तीला ससोबाची दया आली. त्याने आपल्या सोंडेने सशाला वर उचललं व आपल्या पाठीवर घेतलं. ससोबाला हायसं वाटलं व त्याने हत्तीचे आभार मानले. मागून येणाऱ्या कुत्र्यांना ससोबा कुठे दिसलाच नाही. काही वेळाने त्यांच्या लक्षात आलं की, ससा हत्तीच्या पाठीवर बसला आहे व ते तेथून पळून गेले. अशा**



**प्रकारे हत्तीने सशाचे प्राण वाचवले. सशाला कळून चुकलं की बाकीचे प्राणी आपले नुसतेच मित्र आहेत. आपला खरा मित्र हत्तीच आहे. तेव्हापासून त्या दोघांची छान गट्टी झाली.**

**तात्पर्य- जो संकटाच्या वेळी मदतीला येतो तोच खरा मित्र असतो.**

## खाली दिलेले सूचना फलक वाच.



No Entry



No Sound



No Parking



Turn Left



Turn Right



Crosswalk




Entry, Exit




Open, Closed




Parking




Stop



Roadwork



Railway Crossing

दिनांक : ........ / ........ / ........

**मोठ्याने वाच. रिकाम्या जागेत शब्द पुन्हा लिही.**

वृ......



वृक्ष

क् + ष् + अ =क्ष

लक्ष दक्ष भक्ष पक्षी


क्षमस्व लक्ष्मण क्षत्रिय शिक्षक

प्रशिक्षण नक्षीकाम क्षणोक्षणी

क्षणा क्षणाला शिकणे म्हणजे शिक्षण.

---

.....नेश्वर



ज्ञानेश्वर

द् + न् + य् + अ = ज्ञ

यज्ञ ज्ञान आज्ञा सुज्ञ


अज्ञान विज्ञान सज्ञान प्रतिज्ञा


ज्ञानेश्वरी वैज्ञानिक ज्ञानदेव


प्रज्ञा गुणाकार कर.


दिनांक : ........ / ........ / ........

**खालील चौकोनातील संख्यांचे निरीक्षण करुन रिकाम्या जागी अचूक संख्या लिही आणि त्या संख्या खालील संख्यारेषेवर दाखव.**




---

**खालील शब्द 5 वेळा वाच आणि शब्द शिक.**

| et | | id | | ig | | in | | ip | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| bet | let | bid | hid | big | pig | bin | fin | tip | lip |
| jet | pet | kid | lid | dig | wig | tin | win | dip | hip |
| wet | yet | amid | grid | fig | twig | chin | grin | skip | ship |
| met | set | slid | skid | jig | rig | twin | skin | clip | strip |
| **it** | | **ob** | | **og** | | **op** | | **ot** | |
| fit | hit | mob | job | dog | fog | mop | hop | cot | jot |
| pit | sit | rob | sob | log | jog | pop | top | hot | pot |
| split | quit | cob | bob | frog | clog | crop | drop | clot | plot |
| knit | grit | snob | slop | smog | hog | flop | shop | knot | spot |

---

**रिकाम्या जागा भर.**



sh____

l____





s__i__

__o__






__r__g

दिनांक : ........ / ........ / ........

**खालील चित्रे काळजीपूर्वक बघ आणि गोष्ट सांग. मराठीमधील शब्दांची इंग्रजीतील शब्दांशी जोडी लाव.**

**<u>दुर्भाग्य</u>**



Tail

Climb

Narrow

Cat

Rat Hole

Mouse

Bottle

Hook

Inside

मांजर

उंदीर

आतील

बाटली

शेपटी

अरुंद

चढणे


आकडा

उंदराचे बिळ

दिनांक : ........ / ........ / ........

**मोठ्याने वाच. रिकाम्या जागेत शब्द पुन्हा लिही.**

धनु....



धनुष्य

ष् + य = ष्य

कष्ट शिष्य सृष्टी पुष्प


अष्टर दुष्काळ महर्षी अष्टमी

आकर्षण पराकाष्ठा मार्गशीर्ष

एका वर्षामध्ये बारा महिने असतात.

---

शू......



शून्य

न् + य = न्य

जन्म धान्य मान्य चिन्ह


अनन्य बावन्न सामान्य ईशान्य

न्यायाधीश जन्मदिन धन्वंतरी

प्रयत्नांती परमेश्वर.

दिनांक : ........ / ........ / ........

**सभोवताली पाहत राहा. यापैकी जर तु काही पाहिले असेल, तर दिलेल्या चौकोनात बरोबरची खूण ☑ कर. शिवाय काय पाहिले? कधी पाहिले? आणि कुठे पाहिले? याची देखील शक्य असल्यास नोंद ठेव.**



लाल किंवा नारंगी रंगाचे फुल



झाडाच्या बुंध्यावरील मुंग्या



उडणारा पक्षी



झाडावरचा वेल


---

**खाली असे शब्द दिले आहेत, जे ओठ बंद न करता देखील सांगता येवु शकतात. ते वाच आणि स्वत: तपास. अशा आणखी 10 शब्दांची यादी तु कर.**

1. लवकर
2. खिडकी
3. गाढव
4. देव
5. नट
6. खारट
7. नारळ
8. देणगी
9. कचरा
10. कला
11. नदी
12. झरा
13. रथ
14. तलाव
15. केळी
16. संत्री
17. एकनाथ
18. देवदास
19. सायली
20. निकिता
21. ______
22. ______
23. ______
24. ______
25. ______
26. ______
27. ______
28. ______
29. ______
30. ______

दिनांक : ........ / ........ / ........

**खालील गोष्ट वाचण्याचा प्रयत्न कर. आवश्यक असल्यास पालकांची मदत घे. गोष्टीमधील अधोरेखित केलेले शब्द तुझ्या वहीत लिही.**



## झाडाचे प्रेम



**एका शेताच्या बांधावर बाभूळ व आंबा उगवले होते. बाभळीचे झाड गरिब होते. एके दिवशी आंबा बाभळीला म्हणाला,''अरे! मी बघ कसा हिरवा, पिवळा आणि डेरेदार दिसतोय!'' बाभूळ आंब्याला म्हणाले,''अरे जसा तुझा फायदा होतो तसा माझा ही फायदा होतो.''**



**दुसऱ्या दिवशी तेथे दोन माणसे येतात. त्यांच्या बरोबर गाय, म्हैस, बैल, शेळ्या आणि मेंढ्या होत्या. त्या माणसांनी बाभळीचे झाड तोडण्यास सुरुवात केली, तेवढ्यात शेतात खेळणाऱ्या मुलांनी ते पाहिले. त्यांनी त्यांच्या मित्रांना बोलावले आणि ते म्हणाले ,'' मित्रांनो, ती दोन माणसे आपल्या झाडाला तोडतात. आपण सगळे जण मिळून त्या झाडाला तोडू देणार नाही. मग ती मुले त्या माणसांना म्हणाली ,''काका हे झाड तुम्ही तोडू नका. हे झाड छोटे आहे तेव्हापासून ते आम्ही वाढवत आहोत आणि हे झाड आमच्या शेताच्या बांधावर आहे. तुम्ही परत जा. त्या मुलांचे झाडाविषयी प्रेम पाहून आंब्याला स्वतःच्या वागण्याची**






**लाज वाटायला लागली आणि तो म्हणाला, ''बाभूळ झाड, मला माफ कर. त्यानंतर ते दोघे भावासारखे आनंदाने राहू लागले.**


**तात्पर्य- कधी कुणाला रंग, रुपावरुन हिनवू नये.**

दिनांक : ........ / ........ / ........

**मोठ्याने वाच. रिकाम्या जागेत शब्द पुन्हा लिही.**



शि.....



शिक्का

क् + क = क्क

शक्य रक्त थक्क चिक्की

सशक्त शक्कल वक्तव्य शक्यता

डबक्यात तालुक्यात वैयक्तिक

कमलाने गावाला मुक्काम केला.

---

.......थ



ग्रंथ

ग + र् = ग्र

लग्न भाग्य आग्रा योग्य



एकाग्र खग्रास ग्रामीण अग्नेय

ग्रहमान भाग्यवान अग्रेसर

पृथ्वी हा एक ग्रह आहे.

दिनांक : ........ / ........ / ........


**डाव्या बाजूला दिलेल्या चित्राचे वाचन कर आणि उच्चारात साम्य असलेल्या उजव्या बाजूकडील शब्दांच्या समोर बरोबरची खूण ☑ कर.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
|  Lid |  Hat ☐ |  Kid ☐ |  Tree ☐ |  Bib ☐ |
|  Beg |  Ham ☐ |  Bat ☐ |  Peg ☐ |  Leg ☐ |
|  Jet |  Net ☐ |  Pan ☐ |  Cup ☐ |  Vet ☐ |
|  Wag |  Fax ☐ |  Tag ☐ |  Rag ☐ |  Hug ☐ |
|  Tin |  Fin ☐ |  Wing ☐ |  Pin ☐ |  Wax ☐ |


दिनांक : ........ / ........ / ........

**संख्यांचे निरीक्षण करुन रिकाम्या जागी योग्य संख्या लिही.**


a)




b)





c)




---

**उदाहरणात दाखविल्याप्रमाणे संख्येच्या पुढील आणि मागील संख्या लिही.**


a)




21 < 22 < 23 ______

< 30 < ______

b)




77 ______

85 ______


## अधिक सरावासाठी जागा

''आम्ही ही पुस्तिका निर्माण करत असताना आशया संदर्भातील त्रुटी आणि टंकलेखनातील त्रुटी कमी करण्याचे सर्व प्रयत्न केले आहेत. तथापि, तुम्हाला काही चूक आढळल्यास किंवा या पुस्तिकांची उपयोगिता सुधारण्यासाठी आपल्या काही सूचना असल्यास, कृपया संपर्क साधावा. आपण आपल्या सूचना आम्हाला खालील ई-मेल आयडीवर पाठवू शकता.''

**feedback@sikshana.org**

## एक सवय लागण्यासाठी दोघांनाही लक्ष द्यावे लागते.

जर मुलांना चांगल्या सवयी लावायच्या असतील तर शिक्षक आणि पालक दोघांकडून प्रयत्न होणे गरजेचे आहे.





+91 80 26629890
info@sikshana.org
www.sikshana.org
# 41, K. R. Road, Basavangudi
Bengaluru – 560004, Karnataka


Sikshana FOUNDATION
Love of Learning